# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**Savitribai Phule Pune University**

(formerly University of Pune)

**प्राचार्य / अध्यापक / विद्यापीठ अध्यापक / महाविद्यालये व परिसंस्थेतील विभागप्रमुख यांची विद्यापीठातील विविध अधिकार मंडळावरील निवडणूक.**

## परिपत्रक

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ अन्वये प्राचार्य / अध्यापक / विद्यापीठ अध्यापक / महाविद्यालये व परिसंस्थेतील विभागप्रमुख यांची अधिसभेवरील निवडणूक रविवार, दिनांक २१ जानेवारी, २०१८ रोजी, सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत एकूण ४५ मतदान केंद्रांवर घेण्यात येणार आहे. तसेच सदर निवडणुकीची मतमोजणी मंगळवार, दिनांक २३ जानेवारी, २०१८ रोजी, सकाळी ८.०० वा. पासून मुख्य इमारत, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ७ येथे होणार आहे.

मतदानाच्या दिवशी उक्त निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांना मतदान केंद्रांवर प्रवेश करण्यासाठी व मतमोजणीच्या वेळी उपस्थित राहण्यासाठी विद्यापीठाकडून ओळखपत्र देण्यात येणार आहे.

उमेदवारांचे ओळखपत्र मिळण्यासाठी सर्व संबंधित उमेदवारांनी त्यांचे नजिकच्या काळात काढलेले पासपोर्ट साईज रंगित छायाचित्र निवडणूक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे **दिनांक १२ जानेवारी, २०१८ ते १८ जानेवारी, २०१८** या कालावधीमध्ये कार्यालयीन वेळेत **स्वतः किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या व्यक्तीमार्फत** जमा करावयाचे आहेत. प्राधिकृत व्यक्तीने स्वतःचे छायाचित्र असलेले ओळखपत्र जमा करणे आवश्यक आहे. त्यानंतर संबंधितास विद्यापीठाकडून ओळखपत्र वितरित करण्यात येईल.

त्याचप्रमाणे विविध मतदान केंद्रांवर उमेदवारांचे प्रतिनिधी म्हणून काम करणाऱ्या व्यक्तिसाठी या परिपत्रकास जोडलेला परिशिष्ट - १६ भरुन केंद्राध्यक्षाकडे सादर करावयाचा आहे. परंतु उमेदवारांचे प्रतिनिधी म्हणून काम करणारी व्यक्ती ही संबंधित मतदार यादीतील मतदार असणे आवश्यक आहे.

तसेच मतमोजणीच्या वेळी उमेदवारांचे प्रतिनिधी म्हणून काम पाहणाऱ्या प्रतिनिधींसाठीही ओळखपत्र देण्यात येणार असल्यामुळे संबंधित मतदार यादीतील मतदार असलेल्या व्यक्तीच्या नावाची उमेदवार शिफारस करु शकतात (एका उमेदवारासाठी एक प्रतिनिधी याप्रमाणे). अशा प्रतिनिधींचे नजिकच्या काळात काढलेले पासपोर्ट आकाराचे रंगित छायाचित्र आणि प्रतिनिधीचे छायाचित्र असलेले ओळखपत्र **दिनांक १२ जानेवारी, २०१८ ते १८ जानेवारी, २०१८** या कालावधीमध्ये कार्यालयीन वेळेत उमेदवारांनी निवडणूक विभागाकडे पाठवावीत. अशा प्रतिनिधींनाच मतमोजणीच्या वेळी प्रवेश देण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

10.1.18

(डॉ. अरविंद दि. शाळिग्राम)
प्रभारी कुलसचिव

संदर्भ क्र. : साफुपुविनि/ ४०३
दिनांक : १० /०१/२०१८

प्रत : सर्व संबंधित उमेदवार.

D:\Election 2017\Teachers, PG Teachers, Principal\Notifiacation.docx

परिशिष्ट "सोळा"

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## निवडणूक - २०१७

## मतदान प्रतिनिधीची नेमणूक

--------------------------------------- ची निवडणूक

---------------------------वरील निवडणुकीतील उमेदवार / वरील निवडणुकीतील उमेदवार (उमेदवाराचे नाव व पत्ता) ----------------------------- यांचा निवडणूक प्रतिनिधी याद्वारे ---------------------- यांची मतदान केंद्र क्रमांक ------------------------------- येथे / मतदानासाठी निश्चित केलेली जागा --------------------------------- येथे -------------------- वाजता हजर राहण्याकरिता मतदान प्रतिनिधी म्हणून नेमणूक करीत आहे.

ठिकाण :

-----------------------------------

दिनांक : ---------------------- उमेदवाराची / निवडणूक प्रतिनिधीची नाव व सही

मी असा मतदान प्रतिनिधी म्हणून काम करण्याचे कबूल करतो.

ठिकाण :

-------------------------------------

दिनांक : ------------------------------ मतदान प्रतिनिधीचे नाव, सही व शिक्का